# प्रेस नोट

**घरफोडी करणा-या सराईत आरोपीकडुन ५,२५,०००/- रु. किमतीचे एकुण २१ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.**

समर्थ पोलीस स्टेशन हद्दीत होणा-या घरफोडींच्या गुन्हयांना प्रतिबंध व्हावा याकरीता वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांप्रमाणे तपास पथकाचे आधिकारी/कर्मचारी असे मिळुन समर्थ पोलीस स्टेशन हद्दीत तपास करीत असताना पोलीस कर्मचारी अनिल शिंदे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, समर्थ पोलीस स्टेशन हद्दीत रास्तापेठ याठिकाणी चोरी केलेला गुन्हेगार नामे जयवंत ऊर्फ जयड्या गोवर्धन गायकवाड, वय-३० वर्षे, रा. सुरज प्रोव्हिजन स्टोअर्स जवळ, आंबेडकर वसाहत, डी.पी.रोड, औंध पुणे याने केलेली असुन तो सध्या येरवडा जेल मध्ये आहे. त्यावरुन त्यास सदर गुन्हयाचे कामी दि.१४/०८/२०१७ रोजी अटक करुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने स्वामी सहयोग सोसायटी, १४३/१४४ रास्ता पेठ, पुणे येथे घरफोडी चोरी केल्याचे कबुल केले. तपासादरम्यान त्याचेकडुन ५,२५,०००/- रु. किमतीचे २१ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री रविंद्र सेनगावकर सो,अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर, मा.श्री प्रविण मुंढे सो, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर मा.श्री निलेश मोरे सो,सहायक पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोहिते सो, समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर, श्री सतिश चव्हाण सो, पोलीस निरीक्षक (गुन्हे) समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक एस.डी.चव्हाण, तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक अतकरे, पोलीस हवालदार सुशिल लोणकर, पोलीस नाईक संतोष काळे, पोलीस शिपाई अनिल शिंदे, पोलीस शिपाई साहील शेख, पोलीस शिपाई बाळासाहेब भांगले, पोलीस शिपाई निलेश साबळे, पोलीस शिपाई सचिन शेजाळ यांनी केली आहे.